VOLUME - VIII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# १५. वैदर्भीय काव्यप्रवाहाचा स्वातंत्र्यपूर्व वाङ्मयीन वारसा

**डॉ. जयश्री शास्त्री**
मराठी विभाग प्रमुख, लोकमान्य महाविद्यालय, वरोरा.

**गोषवारा** : विदर्भ भूमीला वाङ्मयीन लाभलेल्या काव्य वारस्थाचा विचार करताना त्याची व्याप्ती आणि खोली भरपूर असल्याचे आढळते. स्वातंत्र्यपूर्व वाङ्मयाच्या काव्यप्रवाहाचा वारसा अभ्यासताना त्यात महानुभावपंथांच्या महदंबेच्या धवळ्यांपासून कवी अमृतराय दयाळनाथ, आद्यकवी मुकुंदराज, श्रीपाद कृष्ण, कवी बी, वीर वामन जोशी, कविभूषण खापर्डे, वा. ना. देशपांडे, कवी अण्णाजी बोबडे, आनंदराव टेकाडे, ना. के. बेहरे, ज. के. उपाध्ये, नी. ब. भवाळकर, गु. ह. देशपांडे, कवी अनिल, ना. घ. देशपांडे, या. मु. पाठक, भ. श्री. पंडित राजा बढे, पांडुरंग मोरे, शरच्चंद्र मुक्तिबोध इ. कवींनी विदर्भातील काव्यदालन स्वप्रतिभेने समृद्ध केलेले दिसते. म्हणूनच विदर्भाला सरस्वतीचे माहेरघर म्हटले गेले तर ती अतिशयोक्ती भासणार नाही. कारण स्वातंत्र्यपूर्व काळात यांनी केलेल्या समृद्ध सकस काव्यावर स्वातंत्र्योत्तर समृद्ध कवींच्या काव्याचे पोषण झाले असे निश्चित म्हणता येते.

विदर्भाला सरस्वतीचा साहित्य कृपा वारसाच लाभला आहे. त्यामुळे वैदर्भीय साहित्याची मोठी परंपरा आहे. वास्तविक साहित्यातील वारसा हा साहित्यगुणाचा म्हणविला गेला. तरी तो संस्कृतीचा वारसा असतो. आपल्या व्यक्तिमत्वानुसार कलावंत परंपरेतील सत्याचा स्वीकार करत असतात. या प्रताचा स्वीकार स्वातंत्र्योत्तर काळातील पहिल्या पिढीपर्यंत केलेला दिसतो. ही वाटचाल कुठल्याशा एका निष्ठाविचारांवर झालेली दिसते. या संदर्भात जुन्या कवींमध्ये कवी अनिल, मुक्तिबोध, मधुकर केचे, म. म. देशपांडे यासारखी अनेक नावे घेता येतात. परंतु आद्यकवयित्री महदाइसा हिने महानुभाव पंथाची निष्ठा स्वीकारून काव्य निर्मितीच्या व्रताचा स्वीकार केला होता. विशेष म्हणजे स्वातंत्र्योत्तर काळातील विदर्भाचेच प्रयोगशील कवी वामन नारायण देशपांडे यांनीच पुढे मूळ सकळ लिपीतील जीर्ण पोथ्यांचे वाचन करून पाठनिश्चिती करण्याचे कार्य करणे हे संशोधन सारस्याच्या इतिहासात अत्यंत सूचक म्हणावे असेच आहे.

वैदर्भीय काव्यप्रवाहाचा वाङ्मयीन वारसा बघू जाता महानुभाव पंथातील आद्य कवयित्री महदाइसा हिच्या नावे 'धवळे', आणि 'रूक्मिणी स्वयंवर' अशी दोन काव्ये आहेत. वास्तविक मूळ पोथी उपलब्ध न झाल्यामुळे 'गर्भकांड–ओव्या' हे काव्य पुढे कळले नाही. ऋद्धपुरचरित्रात असा उल्लेख आहे की, ''आतो मेली गायेना म्हणे:' या श्रीप्रभूंच्या विवाहेच्छेतून रूक्मिणीस्वयंवराची पूर्वार्धरचना उद्भवली. धवळ्यांमध्ये साधी आणि लाघवी रचना दिसते. उदा.

''रूक्मीय म्हणे, ताता ऐसे केवि कीजे
गौळियां घरी कैसी रूक्मीणी दीजे'' ई.

डॉ. आशा सावदेकर यांनी एक सुंदर विधान 'वारसा' या संकल्पनेविषयी केले आहे. त्या म्हणतात, 'वारसा' म्हणे पैतृक संपत्तीवरील स्वामित्व वारसाच्या कायद्यात रक्त संबंधालाही महत्व आहे. विदर्भाचा साहित्यक्षेत्रातील वारसा हा स्त्रीकडून लाभलेला आणि स्त्रियांनी सांभाळलेला आहे.'' (विदर्भाचा वाङ्मयीन वारसा, डॉ. आशा सावदेकर, पृ. ८) महदंबेच्या निमित्ताने केलेले डॉ. सावेदकरांचे हे सार्थ विधान होय.

विदर्भाच्या प्राचीन कवींमध्ये बुलढाण जिल्ह्यातील मेहेकर तालुक्यातील फत्तरखेडा येथिल कवी अमृतराय यांनी कटावात्मक रचना विशेष लिहिल्या. जसे ''मागे ती लुगडी, राकाम बुगडी आडा दिसां बांगडी । घाली ते फुगडी, कधी न रगडी, फाडोतसे आंगडी ।।''[२] (विदर्भाचा वाङ्मयीन वारसा, डॉ. सावदेकर, पृ. १३) वामन दाजी ओक यांच्या मते 'अमृतरायांची वाणी अमृतलहरीसारखी सुधासाविणी आहे. १७ व्या –१८ व्या शतकाच्या उंबरठ्यावरील निर्मितीशील मराठी रचनाकारात अमृतरायांची स्वार्थ ते परमार्थपर रचना लक्षणीय आहे.

साधुकवींची परंपरा निर्माण करणारे विदर्भातील सूर्जी अंजनगांव येथील देवनाथ आणि दयाळनाथ अभंगपर रचनासोबत त्यांनी काही कटावरचनाही केल्या.

देवनाथांनी काही उर्दू पदेही रचली होती. ''तुझिया नामाचे प्रबंध ।

राहो अनुदिनी मज छंद ।।'' किंवा ''माझे निजरूप मज भेटले ।। झाली भेटी, पडली मीठी, पोटी सामावले । अंतर्बाह्य प्रकाराले ।।'' असे पदं त्यांनी रचले. शिवाय कटाव रचना ही केल्या. देवनाथांची परंपरा ही जनार्दन स्वामी एकनाथ यांच्या शिष्य परंपरेतील आहे. देवनाथांचा संचार भारतभर होता म्हणूनते वैदर्भीय असूनही भाऊसाहेब ऊर्फ डॉ. वि. भि कोलते यांनी त्यांना 'भारतीय' म्हटले. देवनाथांचे शिष्य दयाळनाथ यांची कविता कर्णमधुर आणि कोमल स्वरूपाची आहे. उदा.

मधुवनी मुरली वाजविली । सारि गमपधनिसा वाजविली ।।

मृदंग झाली डफ खननननन । धिमकित धिमकित वाजविली ।।

डॉ. सावदेकरांच्या मते 'संगीत आणि काव्य यांचा हा वैदर्भीय काव्यातील संगम हा खरा वारसा आहे. अध्यात्म आणि कलात्मकता यांचे एकत्रित देखणे रूपच आहे.'[३] (उ.नि. पृ. २४)

'वेदान्तविषयक सुलभ ग्रंथरचनेचे उत्तम उदाहरण' म्हणून ज्या मराठी आद्यग्रंथ 'विवेकसिंधू' या उल्लेख केला जातो तो आद्यग्रंथकार विदर्भाचा होय. असे मानले जाते. मुकुंदराज हा नगापूर प्रांतात राहणारा होता असे मत संशोधकांचरू विविध दृष्टीने पुरस्कृत झाले आहे. हे संशोधक म्हणजे भावे, पांगारकर, गजवाडे, डोळके, कृ. पां. कुळकर्णी, डॉ. य. खु. देशपांडे एवढेच नव्हे तर कालगणनानुसारी सिद्धकर्ते डॉ. सुरेश डोळके हे वैदर्भीय आद्यग्रंथकार मुकुंदराजाचे समर्थक आहेत. परमामृतासारखा ग्रंथही त्यांनी लिहिला.

विवेकसिंधूचे उद्दिष्ट म्हणजे 'सुकाळु हो देयावा । ब्रम्हविद्येचा ।।' असे मानले जाते. ''भाषा हो का मऱ्हाटी । परि उपनिषदाचीच राहाटी । तेविचा अर्थु जीवाचिये गाठी । का न बांधावा ।।'' आपलया शब्द रचनेने मुकुंदराजाने वेदान्ताला, गुरूपरंपरेला, लोकभाषेला दिलेले महत्व वैदर्भीय वारसा म्हणून अभ्यासताना महत्वाचे मानले आहे.

स्वतःच्या लेखणीने टीका, नाट्य, काव्य, विनोद अशा सर्व वाङ्मयक्षेत्रांवर अभिराज्य गाजविणारे अनेक प्रतिभावंताचे गुरू श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचा जन्म १८७१ मधील नागपूरचाच 'मूकनायक', 'वीरतनय', 'गुप्तमंजूष', अशी वाग्वैभवशाली नाटक त्यांनी रचली. ललित वाङ्मयाला 'सारस्वत' आणि ललितेतर वाङ्मयाला 'गाणपत' अशी संज्ञा कोल्हटकरांनीच 'मराठी वाङ्मय व स्वावलंबन या लेखात दिली. अतिशय मोजक्या कविता, 'कथासप्तक' नावाचा संग्रह, 'दुटप्पी की दुहेरी' व शामसुंदर' अशा दोन कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. त्यांच्या 'महाराष्ट्र गीतात विदर्भाचे गुणविशेष आणि मराठीचा अभिमान यांचे जिवंत चित्रण दिसते. जसे,

''प्रासाद कशास जेथ हृदयमंदिरे । सद्भावांचीच भव्यदिव्य आगरे । रत्नां वा मौलिकाही मुल्य मुळि नुर । विक्रम वैराग्य एक जागि नांदती'' कोल्हटकरांच्या मते, ''काव्याचे सौंदर्य विषयाच्या व भाषेच्या अभिनवतेवर आणि कवीच्या विशिष्ट मनोधर्मावर जसे अवलंबून असते तसे रसिकाच्या अनुभवावर व मनोरचनेवर सुद्धा अवलंबून असते.''[४] (पृ. ३५, उ.नि.)

वाङ्मयेतिहासकार डॉ. अ. ना. देशपांडे यांनी ज्या कवी 'बी' उर्फ नारायण मुरलीधर गुप्ते यांचा उल्लेख 'चिंतनशील आणि प्रगतिशील रसज्ञ तत्वज्ञ' असाच केलेला आहे. उदात्त, गंभीर, अध्यात्मप्रवण, वैचारिक काव्यभक्कांची त्यांची कविता अतिशय लक्षणीय आहे. उदा. 'पूर्णापासून ढळलेले जग जाते पूर्णाकडे' असे सौंदर्यपूर्ण लिहिणारे 'चाफा' सारखी प्रतीकरूप 'कमळा' सारखी व्यापक आणि 'माझी कन्या' सारखी सुकोमल रचना त्यांनी केली. 'प्रीति', 'बंडवाला', पिंगा, 'आत्मप्रतीती', काव्यानंद', 'कविवंदन', 'विचारतरंग' सारख्या त्यांच्या लक्षणीय रचना होत.

विदर्भातील अमरावती येथे १९८१ साली जन्मलेले राष्ट्रसेवा धर्माला मानणारे वीर वामनराव जोशी यांणी नाट्यसृष्टी निर्माण केली. त्या काळातील नाटक हे संगीत नाटक होते. म्हणजे त्यांच्या ठिकाणी काव्यधर्म होता हे मानावे लागते. 'संगीत धर्मसिंहासन'', 'संगीलत शीलसंन्यास', 'रणदुदुभी' सारख्या ख्यतनाम नाट्यरचना केल्या. ज्यात लक्षणीय काव्य बहरले. उदा. ''दासपणे जगतात मिरवणे ।। त्याहुनि शतपट बरवे मरणे ।। पारतंत्र्य भूवरिचा रोख ।। अधरुपातपथ हा अनुसरणे ।।''(उ.नि. पृ. ४३)

अमरावतीचे जन्मस्थन असलेले १८९० चे विभूषण बळवंत गणेश खापर्डे यांनी 'काव्यकांतार' नामक द्विखंडात्मक महाकाव्य रचले. 'काव्यकांतारातील फुले' हा त्यांचा स्फुट काव्यसंग्रह असुन 'सर्वस्वाची गद्य–गाणी' हे गद्य–काव्य असुन 'अफझल–वधाचा पोवाडा', 'विदर्भगीत' हे काव्य त्यांनी रचले. 'अनंताची हाक' या ईश्वरपर खंडकाव्यात म्हणतात, ''दिले प्रेम मी; तू दिले प्रेम माते इथे सर्व सार्थक्य तू ते ही माते । इथे सर्व सार्थक्य विश्वासि आले । तिथे पोचले जेथ जाया निघाले ।'' कविभूषण खापर्डे यांनी काव्य जागि काव्यविचार यांतून वैदर्भय अभिरूचीचे संवर्धन करण्याची जिद्द बाळगली''[५] (उ.नि. ५०) विदर्भाच्या काव्य वाङ्मयाच्या वारशात त्यांचे स्थान मोलाचे होय.

मूलतः यवतमाळचे १९०३ साली जन्मलेले प्रयोगशील कवी म्हणून मान्यता पावलेले वा. ना. देशपांडे याची 'आराधना', 'अनामिका', 'कोरकू', 'पिकासाचे कबूतर', 'उत्तरायण' व 'विसर्जन' ही सहा काव्यसंग्रह

याखेरिज 'विचारसमीक्षा' व 'विमर्शिनी' हे टीकासंग्रेह, 'रामशास्त्री' हे स्फुटलेखन 'स्मृतिस्थळ' हा संपादित ग्रंथ आणि 'लघुरामायण' आणि 'शारदीय शरसंधान' हे तेरा पुस्तकं प्रकाशित आहे.

रविकिरण मंडळातील नागपूर काव्यमंडळातील ज्येष्ठ सदस्य १९९५ साली जन्मलेले रामचंद्र उपाख्य अण्णाजी बोबडे यांनी राष्ट्रवादी गूढवादी स्वरूपाच्या कविता लिहिल्या.

नागपूर जिल्ह्यातील मोहपा येथे झाला. त्यांची नादानुकूल कविता गुणगुणतच जन्माला आली. 'आनंदगीत खंड १ ते ४' असे काव्यसंग्रह असुन संगीत मथुरा' आणि 'संगीत मधुर मीलन' अशा दोन नाट्यकृतीही त्यांनी निर्माण केल्या. त्यांचे आमुल्य काव्यकेंद्री होते.

''मार्गाने ह्या कवि चाले । अडवू नका कुणि तो बोले ।

खुशाल जाऊ द्या ह्याला । का करण्याचे जगताला ।।'' विशेषत: आनंदकेंद्र ऐसा । हा हिंददेश माझा'' ही त्यांची अत्यंत गाजलेली काव्यरचना. डॉ. सावदेकर यांनी आनंदराव टेकाडे यांना 'आनंद चंडोल' असे गौरविले आहे.

१८९० साली टेंभुर्णी या गावी जन्मलेले ना. के. बेहेरे हे स्फुटकाव्य, खंडकाव्य या खेरिज कांदबरी, चरित्र, विनोदी लेखनाचा वारसा जपणारे नामवंत लेखक. 'मोत्यांची माळ' हा त्यांचा ६७५ पृष्ठांचा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला. त्यात त्यांनी मुलांची गाणी संसारी गीते, सृष्टीचे बोल, राष्ट्रीय कविता, कवीचे तत्वज्ञान अशा बहुआयामांनी लेखन केले.

१८८२ सालचे नागपूर येथे जन्मलेले साहित्यिक कवी जयकृष्णबुवा उपाध्ये यांनी १९२४ साली लोकमान्यांचे ओवीबद्ध चरित्र 'लोकमान्य चरितामृत – प्रथम खंड' या नावाने लिहिले. यमकाचे उच्चाटन करणारी कविता त्यांनी लिहिली.

यवतमाळच्या वाटखेड गावचे कवी गु. ह. देशपांडे यांचा 'निवेदन' हा १९३८ चा पहिला काव्यसंग्रह.

कोणता मानू चंद्रमा ? –भूवरीचा की नभीचा !

एक फुलविती कमलविशेषा । दुजा फुलवि मम मानसकोषा'' ।।

यासारखे अनोखे काव्य त्यांनी लिहिले. निर्वाणोत्तर त्यांचा 'घटप्रभा' हा काव्यसंकग्रह प्रकाशित झाला.

विदर्भातील काव्यक्षेत्रात आणि सांस्कृतिक क्षेत्रात कवीवर्य अनिल ऊर्फ आत्माराम रावजी देशपांडे यांचे स्थान अत्यंत मोलाचे होय. मूर्ति, चित्र आणि संगीत या ललितकलांवर प्रेम करणाऱ्या त्यांच्या कविता गेय होत्या. ज्या गजानन वाटवे, पु. ल. कुमार गंधर्व, वसंतराव देशपांडे, उषा मंगेशकरांनी गायल्या. १९४० मध्ये 'भग्नमूर्ती' ही त्यांची खंडकाव्य रचना प्रसिद्ध झाली. 'फुलवात' हा १९३२ चा काव्यसंग्रह. तर १९४३ मध्ये 'निवासित चिनी मुलास' हे दीर्घकाव्य तर १९४७ साली पेर्ते व्हा' आणि १९६१ साली 'सांगाती' हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला. शिवाय १९७६ मध्ये 'दशपदी' व १९७१ मध्ये चिरयौवन' प्रसिद्ध झाला. ''मी थोड्याच कविता लिहिल्या. तर कुठे काय थोडे झाले?'' असे म्हणतांना विचार व भावना यांचा जुना वैदर्भीय वारसा कवी अनिलांनी आगळ्या प्रकारे पुढे नेला.

कवी ना. घ. देशपांडे हे बुलढाणा येथिल मेहकरचे १९०९ साली जन्मलेले वैदर्भीय वाग्गेयकार शीळ (१९५३), अभिसार (१९६३), खूणगाठी (१९८५), कंचनीचा महाल (१९९६), गुंफण (१९९६) असे त्यांचे पाच काव्यसंग्रह प्रकाशित झाले. नादानुकूल गेय रचना हे त्यांच्या कवितेचे वैशिष्ट्य. ''अनिल अनिवार आद्य ऋषींचा गर्भ मी. / सृजनाचा सूत्रधार आहे हिरण्यगर्भ मी.'' (पृ. ११०)

विदर्भातील वाङ्मयभिरूची संवर्धनाच्या साठी जी नावे घेतली जातात त्यापैकी या. मु. पाठक यांचा जन्म १९०५ सालचा. त्यांनी १९३९ मध्ये 'फुले आणि मुले' हा काव्यसंग्रह, १९२९ मध्ये 'शशिमोहन' हे खंडकाव्य आणि 'अग्निकमल' हा स्फुट काव्यसंग्रह १९९१ मध्ये रचला. मूल्यनिष्ठेचा वारसा त्यांनी जपला.

काव्यप्रीतीचा वारसा जपणारे कवी भ.श्री. पंडित यांनी 'आधुनिक मराठी कविता' हा प्रबंधग्रंथ, प्रवाहिनी (१९५६), रसधारा (१९५२), हे संपादित काव्यसंग्रह तर 'पिचलेला पावा (१९३३), 'उन्मेष आणि उद्रेक (१९५०), सुवास आणि रस (१९५३), मेघदूताचा मराठी अनुवाद, वीजेची कोर (१९४०), चांदोबा आणि इतर कविता असे बालगीतसंग्रह असे किती कितीतर दालनं त्यांनी समृद्ध केले. ''मला माझ्या काव्यात पहा तुम्ही । त्यात दर्शन देईन तुम्हाला मी ।'' असे थोर कवी संशोधक, प्राध्यापक, समीक्षक भ. श्री. होते.

नागपूर येथे जन्मलेले कवीवर्य गीतकार राजा बेढ क्रांतिमाला (१९४२), हसले मनी चांदणे (१९४८), माझिया माहेरा जा व इतर वीणागीते (१९४९), मखमल (१९७६), मंदिका (१९७६) हे काव्यसंग्रह तसेच शृंगार श्रीरंग, छंदमेघ, द्राक्षायणी, शेफालिका असे अनुवादित काव्यही त्यांनी निर्मिले. त्यांची रसिक कविता शृंगारमळा फुलविणारी कविता म्हणून वाखणली गेली.

पांडुरंग श्रावण गोरे १९०५ साली जन्मलेला शेतकरी कुळातला कवी. बोबडे बोल (१९३२) आणि वाणीचा हुरडा 'वऱ्हाडी लोकगीते' (१९४२) अशी त्यांची प्रसिद्ध काव्यसंपदा हो.

अभिरूची संवर्धनाची मूल्यनिष्ठा जपणारे टीकाकार पत्रकार, कादंबरीकार श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्या प्रारंभीच्या काळात त्यांनी 'वाग्देवतेस' सारखे काव्य लेखन केले.

मानुषतेचे मूल्य जोपासणारे समष्टीनिष्ठ काव्य रचना करणारे कवीवर्य शरच्चंद्र मुक्तिबोध यांनी काव्यातील नवीनतेसाठी त्यांनी आशयातील बदलाकडे लक्ष पुरविले. नवी मळवाट (१९४९) मधून, ''जे नाशांतुन, मृत्यूंतुन, पीडेतुन ये—स्वागत.

ये अश्रूतुन, अपमानातुन, दैन्यातुन ये — स्वागत.''७ (पृ. १६८) असे ते म्हणतात. १९५७ मध्ये श्रमिक हा काव्यसंग्रंह त्यांनी लिहिला. १९९८ मध्ये निधनोत्तर त्यांचा 'सत्याची जात' हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला. मानुषतेच्या मूल्याची जोपासना करणारे समाजवादी प्रतिभावंत कवी म्हणून ते गणले गेले.

**गोषवारा**

विदर्भ भूमीला वाङ्मयीन लाभलेल्या काव्य वारस्याचा विचार करताना त्याची व्याप्ती आणि खोली भरपूर असल्याचे आढळते. स्वातंत्र्यपूर्व वाङ्मयाच्या काव्यप्रवाहाचा वारसा अभ्यासताना त्यात महानुभावपंथांच्या महदंबेच्या धवळ्यांपासून कवी अमृतराय दयाळनाथ, आद्यकवी मुकुंदराज, श्रीपाद कृष्ण, कवी बी, वीर वामन जोशी, कविभूषण खापर्डे, वा. ना. देशपांडे, कवी अण्णाजी बोबडे, आनंदराव टेकाडे, ना. के. बेहरे, ज. के.

उपाध्ये, नी. ब. भवाळकर, ग. ह. देशपांडे, कवी अनिल, ना. घ. देशपांडे, या. मु. पाठक, म. श्री. गडित राजा बढे, पांडुरंग मोरे, शरच्चंद्र मुक्तिबोध इ. कवींनी विदर्भातील काव्यदालन स्वप्रतिभेने समृद्ध केलेले दिसते. म्हणूनच विदर्भाला सरस्वतीचे माहेरघर म्हटले गेले तर ती अतिशयोक्ती भासणार नाही. कारण स्वातंत्र्यपूर्व काळात यांनी केलेल्या समृद्ध सकस काव्यावर स्वातंत्र्योत्तर समृद्ध कवींच्या काव्याचे पोषण आले असे निश्चित म्हणता येते.

**संदर्भ**

- विदर्भाचा वाङ्मयीन वारसा, डॉ. आशा सावदेकर, ज्ञानेश प्रकाश, २००३